मोटार अपघात दावा क्र.२४०/२०२०

ज्योती व ईतर वि. नागुबुआ व ईतर

नि.क्र.५४

**गैरअर्जदार क्र.१ व त्यांचे विधीज्ञ गैरहजर.**

**गैरअर्जदार क्र.२ विरूध्द एकतर्फा आदेश. सबब, उलट तपास नाही.**

**गैरअर्जदार क्र.३ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.एस.जी.दिवाण यांच्या वतीने शपथेवर सुरू**

१. मी राहण्यास लातूर येथे आहे. माझी इंडस्ट्री ही घटनेच्या वेळी लातूर - नांदेड रस्त्यावर ममदापूर पाटी येथे पेट्रोल पंपालगत होती. माझी कंपनी पेट्रोल पंपाला लागूनच होती. हे म्हणणे खरे नाही की, माझी कंपनी ही पेट्रोल पंपाला लागून नव्हती व ती पेट्रोल पंपापासून लांब अंतरावर होती. घटनास्थळ हे माझ्या कंपनीच्या समोरच होते. घटनेच्या वेळी मला आवाज आला. हे म्हणणे खरे आहे की, आवाज आल्यानंतर मी माझ्या नोकराला बोलावून घटनास्थळावर गेलो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी अंधार होता म्हणून मी बॅटरी घेवून गेलो. हे म्हणणे खरे आहे की,मी घटनास्थळी गेलो त्यावेळी मोटार सायकल व एक व्यक्ती पडलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळावर गेल्यावर मोटार सायकल व्यतिरिक्त् दुसरे कोणतेही वाहन घटनास्थळावर नव्हते. मी स्वतः अॅम्ब्यूलन्सला फोन केला होता. त्यानंतर साधारण अर्धा तासाने अॅम्ब्सुलन्स आली होती. मयताचे नातेवाईक हे घटनास्थळावर साधारण तासानंतर आले. माझी त्या लोकांशी भेट झाली होती. त्यावेळी त्या लोकांनी माझ्याकडे घटनेबाबत जास्त चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांना घटना कशी घडली त्याची माहिती सांगितली नाही. घटनेच्या वेळेस मी सुगाव गावामध्ये राहत होतो. हे मला माहित नाही की, घटनास्थळ हे लातूर ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत आहे. मी घटनेबाबत पोलीसांना फोन केला नाही. मी घटनास्थळाचे फोटो घेतले नाहीत. मी दुस-या दिवशी पोलीस ठाण्यात जावून घटनेची माहिती दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी शिवशाही बस क्र.एम.एच.२९-बी.ई.-२०५७ या बसने मयताच्या मोटार सायकलला धडक दिली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी अपघात कसा घडला याची मला काहीही माहिती

**मोटार अपघात दावा क्र.२४०/२०२०**
**ज्योती व ईतर वि. नागुबुआ व ईतर**
**नि.क्र.५४**

नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबाबत काहीही माहिती नसल्याने मी मयताच्या नातेवाईकांना व पोलीसांना काहीही माहिती दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेनंतर मी बस क्र.एम.एच.२९-बी.ई.-२०५७ या वाहनाने धडक दिली असे खोटेपणाने सांगून ते वाहन अपघातात गुंतविले. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील सर्व मजकूर खोटा सांगितला आहे.

**गैरअर्जदार क्र.४ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.एम.डी.इंगळे यांच्या वतीने**

२. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्र वकिल साहेबांनी तयार केले व मी त्यावर सही करून ते न्यायालयात दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, अपघात झाला त्यावेळी लाईटची व्यवस्था नव्हती व तेथे अंधार होता. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या कंपनीत काम करीत असताना आवाज आला म्हणून मी बाहेर आलो. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी अंधार असल्यामुळे अपघात कसा झाला याची मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अपघात पाहिला नसल्यामुळे शिवशाही बसचा चालक वाहन निष्काळजीपणे चालवित होता असे खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराला नुकसान भरपाई मिळावी म्हणून मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

Digitally signed by PADMAKAR PRABHAKAR KESTIKAR
Date: 2026.01.28 16:39:28 +0530

(पी.पी.केस्तीकर)

दि.२८/०१/२०२६

तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ व
पदसिध्द सदस्य,मो.अ.दा.प्रा.,
लातूर